स्वामी रामानंद तिर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

स्वामी रामानंद तिर्थ मराठवाडा विद्यापीठाच्या सामाजिकशास्त्रे
विद्याशाखे अंतर्गत राज्यशास्त्र विषयातील पीएच.डी.
पदवी करीता सादर करावयाच्या शोध प्रबंधाचा आराखडा

संशोधन विषय

"महाराष्ट्रातील आघाड्यांचे बदलते राजकारण : एक समिक्षात्मक अभ्यास"
(2019 ते 2024)

संशोधक

शंकर हणमंतराव पाटील

मार्गदर्शक

प्रा.डॉ.माधव माणिकराव चोले
राज्यशास्त्र विभाग
देगलूर महाविद्यालय, देगलूर

संशोधन केंद्र

देगलूर महाविद्यालय देगलूर
2023

प्रस्तावना :-

1947 पर्यंत भारत हा ब्रिटीश सत्तेचा अंमलाखाली देश होता. आजच्या भारतीय राजकारणाचे चित्र स्पष्ट करावयाचे झाल्यास भारताने बहुपक्ष पध्दतीचा स्विकार केलेला आहे. बहुपक्ष पध्दती म्हटले की, त्यात सत्ता-संघर्ष येणार आणि कोणत्याही एका पक्षाला स्पष्ट बहुमत मिळत नसल्याने आघाडीचे राजकारण अपरिहार्यपणे पुढे आले. याचा अभ्यास करण्यासाठी "महाराष्ट्रातील आघाड्यांचे बदलते राजकारण एक समिक्षात्मक अभ्यास" (सन 2019 ते 2024) हा विषय संशोधनासाठी मी निवडलेला आहे.

महाराष्ट्रातील राजकारणाचा अभ्यास करताना सन 2019 ते 2024 या कालखंडातील महत्वाची बाब म्हणजे नैसर्गिक, वैचारीक आघाड्या फुटल्या अर्थात विभिन्न कारणासाठी एकत्रित आले. महाराष्ट्रातील अनेक पक्ष आपली तत्वे विचार सोडून सत्तेच्या लालसेपोटी एकत्रित आले आहेत. 2019 मधिल विधानसभेतील चित्र पाहिल्यास हिंदुत्ववादी भाजपा, शिवसेना या पक्षांनी आपआपले तत्वे विचार सोडून स्वार्थाच्या राजकारणाची भुमिका निभावत आहेत. शिवसेना, काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस या तीन पक्षांनी भाजपाला सत्तेपासून दूर ठेवून महाराष्ट्रात सत्ता आणली, पण काही दिवसांनी शिवसेनेतील काही नाराज आमदारांनी हिन्दुत्ववादी विचारसरणी असलेल्या भाजपा या पक्षाकडे 40 आमदार घेऊन भाजपा व शिवसेना (एकनाथ शिंदे गट) यांचे सरकार महाराष्ट्रात अस्तित्वात आले पण काही कालावधीनंतर राष्ट्रवादी काँग्रेस मध्ये फूट पडून अजित पवार यांनी शरद पवार यांची साथ सोडून भाजपा या पक्षाला पाठिंबा दिले. तर महाराष्ट्रातील भाजपा, शिवसेना (एकनाथ शिंदे गट) व राष्ट्रवादी अजित पवार यांचा गट मिळून आज महाराष्ट्रात सरकार अस्तित्वात आले. या संपूर्ण घटनाक्रमाचा अभ्यास करण्यासाठी यातील गट हे समाज उपयोगी कार्य करण्यासाठी गेले किंवा स्वार्थी लालसेपोटी सरकार तयार केले. याचा अभ्यास करण्यासाठी हा विषय मी निवडलेला आहे.

महाराष्ट्र हे भारताच्या पश्चिम भागातले एक राज्य आहे, क्षेत्रफळाच्या दृष्टीने महाराष्ट्र भारतातील तिसरे व लोकसंख्येच्या बाबतीत दुसरे मोठे राज्य आहे. महाराष्ट्र राज्याच्या सीमा गुजरात, मध्यप्रदेश, छत्तीसगढ, तेलंगणा, कर्नाटक, गोवा आणि दादरा नगर हवेली या केंद्रशासीत प्रदेशाशी जोडलेला आहे. राज्याच्या पश्चिमेला अरबी समुद्राची 720 कि.मी. चे किनारपट्टी आहे. जवळपास 11 कोटी लोकसंख्या महाराष्ट्राची आहे. महाराष्ट्राची राजधानी मुंबई आहे. मुंबईत साधारणतः 1.8 कोटी लोक राहतात. महाराष्ट्राला जगतगुरु संत तुकाराम, संत ज्ञानेश्वर, संत चोखामेळा, संत एकनाथ, संत नामदेव, संत गाडगेबाबा, संत मुक्ताई यासारख्या अनेक महान संतांचा वारसा लाभला आहे. त्यामुळे या राज्यास संतांची भुमि असे देखिल म्हटले आहे. महाराष्ट्रात सात वाहनांनंतर पाच राज्य घरान्यांना राज्य केले.

वाकाटक घराण्यांची सत्ता नंदी वर्धन आणि वत्सलगुम येथील वाकाटक या राजघराण्यांनी इसवी सन 250 ते 550 या काळात 300 वर्ष राज्य केले.

बदामीच्या चालूक्य घराण्याची सत्ता इसवी सन 550 मध्ये बदामीच्या चालूक्य राज्य घराण्यांची सत्ता प्रस्थापित झाली. नर्मदेपासून ते सोमेश्वर पर्यंत हे चालुक्य साम्राज्य विस्तारले होते. त्यानंतर राष्ट्रकूट घराण्यांची सत्ता इसवी सन 754 साली दंतिदुर्ग या राष्ट्रकुट घराण्यातील सेनापतीने शिरपूर, रायपूर, नागपूर जवळील रामटेक येथील राज्यांचा पराभव करून आपले स्वतंत्र साम्राज्य प्रस्थापीत केले. खानदेश, सातारा, नाशिक, पूणे या भागात राष्ट्रकुट घराणे विस्तारले होते.

कल्याणीच्या चालुकय घराण्याची सत्ता : इसवी सन 973 च्या सुमारास राष्ट्रकुटाचा अस्त होऊन कल्याणीच्या चालुक्य घराण्याची सत्ता उदयाला आली, वास्तविक बदामीच्या चालुक्यांपैकीच हे घराणे होय.

देवगिरीच्या यादवांची सत्ता : इसवीसन 1190 मध्ये देवगिरीच्या यादव घराण्यांची सत्ता उदयाला आली. उत्तरेस गुजरात, माळवा आणि दक्षिणेस कावेरीपर्यंत त्यांचे साम्राज्य पसरले होते. इसवी सन 1318 पर्यंत यादवांची सत्ता महाराष्ट्रात टिकून होती. इसवी सन 1294 साली अल्लाउद्दीन खिलजीने देवगिरीच्या यादवांचे राज्य जिंकून मुसलमानांची सत्ता प्रस्थापित केली. इसवी सन 1347 मध्ये बहामनी राज्याची स्थापना केली. हे बहामनी राज्य 1458 पर्यंत टिकले या राज्याचे पुढीलप्रमाणे पाच तुकडे पाडले.

1) वऱ्हाडाची इमादशाही (1484),

2) अहमदनगरची निजामशाही (1485)

3) विजापूरची आदिलशाही (1489)

4) बिदरची बरीदशाही (1492)

गोवळकोंड्याची कुतुबशाही (1512) बहामनी राज्याचे हे पाचही तुकडे पुढे दिल्लीच्या मोगल बादशहाने जिंकून आपल्या मोगल साम्राज्याला जोडले.

मराठेशाही

17 व्या शतकात मराठी सत्तेचा उदय झाला. मोगल दरबारी शहाजे राजे होते, त्यांचे पुत्र शिवाजी यांनी मावळ्यातील तरूणांची संघटना उभारून हिंदवी स्वराज्याची स्थापना केली. 1674 साली रायगड येथे राज्याभिषेक होऊन छत्रपती शिवाजी महाराज हे स्वतंत्र सार्वभोम राजे बनले.

उत्तरेकडे मराठा साम्राज्य विस्तारत असताना 1761 च्या पानिपतच्या लढाईत मराठ्यांना अपयश आले. 1857 च्या स्वातंत्र्य लढ्यात महाराष्ट्राने नेतृत्व केले होते. नानासाहेब पेशवे, राणी लक्ष्मीबाई, तात्या टोपे यांनी या स्वातंत्र्य लढ्याचे नेतृत्व केले होते. त्यानंतर पढे 1920 साली महात्मा गांधीजीच्या नेतृत्वाखाली स्वातंत्र्य आंदोलन सुरु झाले. महाराष्ट्रातील नेत्यांनी गांधीजींच्या नेतृत्वाला समर्थ साथ देऊन उत्तम प्रकारे सहकार्य केले होते.

संयक्त महाराष्ट्र चळवळ1955 साली सुरु झाली असली तरी तिची खरी सुरुवात 1938 साली वऱ्हाड प्रांतात झाली. 1 ऑक्टोंबर 1938 रोजी सी.पी.बेरार प्रातांच्या विधीमंडळाचे प्रतिनिधी श्री रामराव देशमुख यांनी असा ठराव मांडला. 1939 साली नगर येथे भरलेल्या साहित्य संमलेनात सर्व मराठी भाषा प्रादेशांचा मिळून एक प्रांत बनवावा आणि त्याला संयुक्त महाराष्ट्र असे नाव द्यावे, असा ठराव मांडण्यात आला. 1940 साली श्री रामराव देशमुख यांच्या अध्यक्षतेखाली मुंबई येथे संयुक्त महाराष्ट्र सभा ही संघटना स्थापना झाली.

काही वर्षानी 1946 मध्ये बेळगाव येथे ग.त्र्यं.माडखोलकर यांच्या अध्यक्षतेखाली संयुक्त महाराष्ट्राच्या मागणीचा ठराव मंजूर करण्यात आला, या संमेलनात संयुक्त महाराष्ट्र परिषद स्थापन करण्यात आली. पुढे काही कालावधीनंतर 1 मे 1960 ला महाराष्ट्र राज्याची स्थापना झाली व महाराष्ट्र राज्याचे पहीले मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण हे होते.

महाराष्ट्र राज्याची स्थापना झाल्यानंतर राजकारणाचे एक नवे पर्व सुरु झाले असले तरी 1956-57 पासूनच महाराष्ट्राच्या राजकारणातील काँग्रेस वर्चस्वाची चौकट तयार होत होती. काँग्रेसचे हे वर्चस्व आखिल भारतीय पातळीवरही होते. पण महाराष्ट्राच्या संदर्भात काँग्रेस वर्चस्व काही खास वैशिष्ट्ये होती, त्यामुळेच 1967 मध्ये उत्तर भारतात काँग्रेसच्या वर्चस्वाला धक्के बसू लागले. तरी महाराष्ट्रात 1975-76 पर्यंत काँग्रेस वर्चस्व अबाधित राहिले. 1956 मध्ये यशवंतराव चव्हाण मुख्यमंत्री झाले त्यानंतर त्यांनी महाराष्ट्रातील काँग्रसेची सत्ता बळकट करण्यावर भर दिला म्हणून 1977 काळातील पुलोद सरकारचा अल्पकाळ सोडला तर 1995 पर्यंत महाराष्ट्रात काँग्रेसने आपले स्थान टिकवून ठेवले होते.

20 व्या शतकाच्या शेवटच्या दशकात संपूर्ण जागतिक स्तरावर होणाऱ्या परिवर्तनाबरोबरच भारत व महाराष्ट्राचया पक्षीय राजकारणातही नवे युतीचे समीकरण पुढे आलेले दिसून येते. महाराष्ट्रात 1978 मध्ये महाराष्ट्रातील काँग्रेस पक्षात फूट पडून इंदिरानिष्ठ आणि इंदिराविरोधक अशी विभागणी झाली. इंदिरा विरोधकांमधील शरद पवार गट 1980 च्या दशकात पवारांच काँग्रेस (एस) ने पमुख विरोधी पक्षाची भुमिका निभवली. 1985 मध्ये इंदिरा काँग्रसेला 44 टक्के मते मिळाली तर काँग्रेस (एस) ला 17 ते 20

टक्के मते मिळाली. 1978 नंतरच्या बदलत्या राजकीय परिस्थितीत महाराष्ट्राच्या राजकारणातील स्पर्धात्मकता मोठया प्रमाणावर वाढली. कोणत्याही पक्षाचे यश गृहीत धरून चालता येणार नाही. अशी स्थिती उदभवली. सत्ता विविध पक्षांकडे आलटून पालटून जात राहिली, प्रथमच बिगर काँग्रेस पक्ष 1978 मध्ये सत्तेत सहभागी झाले. जनता पक्ष शे.का.पक्ष हाही वाटेकरी प्रथमच काँग्रेस पक्षाच्या कार्यकर्त्यांना सरकार विरोधकाचे राजकारण करावे लागले.

1986 नंतर पवार व त्यांचा काँग्रेस (एस) पक्ष इंदिरा काँग्रेसमध्ये सामील झाला, त्याच सुमारास शिवसेनेचा राज्य पातळीवरील पक्ष म्हणून उदय झाला. त्यामुळे काँग्रेस (एस) च्या गैरहजेरीमुळे निर्माण होवू पाहणारी पोकळी शिवसेनेने (1989 पासून भाजपाच्या बरोबर) भरून काढली व 1990 मध्ये शिवसेना हा सर्वात माठा विरोधी पक्ष बनला, कारण काँग्रेस, शिवसेना व भाजपा आणि जनता दल व शे.का.पं. अशी बहुपक्षीय व्यवस्था महाराष्ट्राच्या राजकारणाला प्राप्त झाली.

1999 मध्ये विधानसभेच्या निवडणूका पार पाडल्या यात काँग्रेस पक्षाला सर्वात जास्त जागा (75) मिळाल्या तर राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाला 58 जागा मिळाल्या होत्या. 1999 मध्ये काँग्रसेने व राष्ट्रवादी काँग्रसेने निवडणूकीनंतर आघाडी स्थापन करून सरकार स्थापनाचा प्रयत्न केला, परंतू स्पष्ट बहुमत नसल्याने जनता पक्ष, शे.का.प. बहुजन महासंघ, रिपब्लीकन पक्ष.

2004 मधील आघाडी सरकार मध्ये काँग्रेस शे.का.प. रिपब्लीकन पक्ष यांचे मिळून सरकार बनले तसेच 2009 मध्ये काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस व शे.का.पं. यांचे मिळून सरकार बनले सन 2009 मध्ये काँग्रेस व राष्ट्रवादी यांचे सरकार आघाडी बनवून सरकार तयार केले याच सुमारास महाराष्ट्रात महाराष्ट्र नवनिर्माण सेना या पक्षाचा उदय झाला. सन 2014 ते 2019 या काळात भाजपा या पक्षाचे सरकार आले. 2019 या दरम्यान भाजपाला वेगळे ठेवून शिवसेना, काँग्रेस, राष्ट्रवादी यांचे सरकार आले. काही दिवसानंतर शिवसेनेतील नाराज 40 आमदार फूटून एकनाथ शिंदे यांचा गट निर्माण झाला. एकनाथ शिंदे यांनी 40 आमदारांचा पाठिंबा भाजपा या पक्षाला दिला व काही दिवसांनी राष्ट्रवादी काँग्रेस मधून फूटून अजित पवार गट भाजपा या पक्षाला पाठिंबा दिलेला आहे. आज महाराष्ट्रात भाजपा, शिवसेना (एकनाथ शिंदे गट), अजित पवार गट (राष्ट्रवादी काँग्रेस) या तिघांचे मिळून सरकार महाराष्ट्रात चालत आहे. यातील प्रमुख प्रश्नांचा अभ्यास करण्यासाठी तसेच त्यांच्या मागच्या कारणांचा शोध घेण्यासाठी सत्तेच्या

लालसेपोटी सरकार तयार केले आहेत का? याचा अभ्यास करण्यासाठी महाराष्ट्रातील आघाड्यांचे बदलते राजकारण एक समिक्षात्मक अभ्यास सन (2019 ते 2024) हा विषय निवडलेला आहे.

संशोधन विषयाचे महत्व :-

सदर संशोधन प्रबंधासाठी निवडलेला विषय महाराष्ट्रातील आघाड्यांचे बदलते राजकारण (सन 2019 ते 2024) एक समिक्षात्मक अभ्यास हा असून या विषयाचे महत्व म्हणजे आज बहुपक्ष पध्दती असल्यामुळे अनेक प्रादेशिक पक्षांना अत्यंत महत्व आलेले आहे. कॉंग्रेस, भाजपा, राष्ट्रवादी कॉंग्रेस (शरद पवार गट), शिवसेना (उध्दव ठाकरे गट), मनसे, आरपीए किंवा तिसरी आघाडी या कोणत्याच पक्षाला स्पष्ट बहुमत महाराष्ट्रात मिळत नाही. त्यातील प्रादेशिक व स्थानिक पक्ष किंवा अपक्षांना अत्यंत महत्व आले आहे. म्हणून ज्वलंत विषयाचे अभ्यास करणे महत्वाचे वाटते. म्हणून या विषयाचे अत्यंत महत्व दिसून येते.

संशोधनाची उद्दीष्ट्ये :-

1) वैचारिक दृष्ट्या बदललेल्या राजकीय पक्षांच्या आघाड्यांचा अभ्यास करणे.

2) या आघाड्या बदलण्या मागच्या कारणांचा शोध घेणे/अध्ययन करणे.

3) आघाड्या बदलण्या मागे सत्तेचे राजकारण आहे का? हे तपासणे.

4) आघाड्या बदला मागे भाजपाची भूमिका काय? याचा अभ्यास करणे.

5) आघाड्या बदला मागील राजकीय स्वार्थीपणाचा अभ्यास करणे.

6) आघाड्यांचे राजकारणातील नैतिकतेचे अध्ययन करणे.

7) बदलत्या आघाड्यांचा महाराष्ट्रावरील परिणामांचा अभ्यास करणे.

8) महाविकास आघाडी उदया मागच्या कारणांचा शोध घेणे.

गृहीत कृत्ये :-

1) महाराष्ट्राच्या राजकारणात बहुपक्ष पध्दती आली आहे.

2) सत्ता केंद्री राजकारण अस्तित्वात येत आहे.

3) केंद्राप्रमाणेच महाराष्ट्राच्या राजकारणात आघाड्यांच्या राजकारणाला प्रारंभ झाला आहे.

4) आघाड्यांच्या राजकारणामुळे राजकीय अस्थैर्य निर्माण झाले आहे.

5) पक्षीय राजकारणात सत्ता स्पर्धा निर्माण होऊन तिसरी आघाडी स्थापन झाली आहे.

6) राजकारणात विचारसरणीपेक्षा स्वहिताला प्राधान्य निर्माण होऊन नैतिक मूल्यांचा ऱ्हास होत आहे.

7) अपक्ष उमेदवारांचा राजकारणात प्रभाव दिसून येतो.

संशोधन पध्दती :-

प्रस्तुत संशोधनासाठी वर्णनात्मक, तुलनात्मक, विश्लेषणात्मक, मौखिक, पध्दती साधने या बाबीच्या माध्यमातून संशोधनाचे कार्य पूर्णत्वास नेले जाईल, संशोधनासाठी संबंधित विषयावरील ग्रंथ, नियतकालिके, मासिक, साप्ताहिके, वर्तमान पत्र, या साधनांचा उपयोग करून संशोधन पूर्ण केले जाणार आहे.

तथ्य संकलन :-

संशोधनास विशिष्ट स्वरूपाचे मार्ग प्राप्त करून देण्याचे साहित्य म्हणजे तथ्य होय. संशोधनात तथ्य संकलन महत्वाची भूमिका बजावतात. संशोधन समस्येशी निगडीत उचित आणि योग्य तथ्य संकलन करणे गरजेचे असते. कारण यावरच संशोधनाची यशस्वीता अवलंबून असते. सामाजिक संशोधनाशी संबंधित विविध घटनांचे अध्ययन करून घटना संबंधीच्या तथ्याचे संकलन केले होते.

प्रस्तुत संशोधन विषयाच्या संशोधनासाठी दोन प्रकारच्या तथ्यांचा उपयोग करण्यात येईल.

1) प्राथमिक स्त्रोत :- प्रस्तुत संशोधनात प्रत्यक्ष मुलाखती घेण्यासाठी नमूना निवड पध्दतीचा वापर करण्यात येईल.

2) दुय्यम स्त्रोत :- महाराष्ट्राच्या आघाड्यांचा बदलते राजकारण एक समिक्षात्मक अभ्यास 2019 ते 2024 या संशोधनासाठी प्रकाशित संदर्भग्रंथ, अप्रकाशित शोध प्रबंध, संशोधन साहित्य, नियत कालिके, वृत्तपत्रे, साहित्य मासिके, इंटरनरेट, संशोधक लेखकाचे लेखन, विचारवंताचे लेखन यासारखे अन्य विश्वसनीय स्त्रोताकडून माहिती संकलित करण्यात येईल.

प्रकरण विभागणी :-

1. प्रास्ताविक व संशोधन आराखडा

2. महाराष्ट्राचे भौगोलिक, ऐतिहासिक, सांस्कृतिक स्थान.

3. महाराष्ट्र राज्याची निर्मिती

   (महाराष्ट्र प्राचीन, मुगलकाळ, शिवकाळ, ब्रिटीशकाळ, स्वातंत्र्योत्तर,संयूक्त महाराष्ट्र चळवळ)

4. महाराष्ट्रातील आघाड्यांचे बदलते स्वरूप

   (आघाड्यांच्या राजकारणाचा उदय, राजकारणांचे प्रादेशिकीकरण, काँग्रेस पक्षाचा ऱ्हास, प्रादेशिक पक्षांचा उदय, बहुपक्षीय राजकारण)

4. महाराष्ट्रातील आघाड्यांचे राजकारण

5. महाराष्ट्रातील आघाड्यांचे बदलते स्वरूप 2019 ते 2024

   1) नैसर्गिक आघाड्या समाप्त

   2) सत्ता केंद्रीय राजकारण

   3) आघाड्यांचे विभक्त

   4) महाविकास आघाडी

   5) महायूती सरकार आघाडी

6. निरीक्षण

संदर्भ सूची :-

1. फडके य. दि. 18 जून 2007, विसाच्या शतकातील महाराष्ट्र खंड सहावा, संयुक्त महाराष्ट्र चळवळ, 1948 जानेवारी 1960 मौज प्रकाशन, पूणे पृष्ठ क्र. 54, 62, 63.

2. फडके य. दि. 18 जून 2007 विसाव्या शतकातील महाराष्ट्र, खंड सातवा, संयुक्त महाराष्ट्र चळवळ 1948 ते जानेवारी 1956 मौज प्रकाशन, पूणे पृष्ठ क्र. 49, 50, 51.

3. पळंशीकर सुहास, मे 2009 भारताच्या राजकारणाचा ताळेबंद, मराठी वाचन साहित्य मालिका क्र. 12 प्रगत अध्ययन केंद्र राज्यशास्त्र व लोकप्रशासन विभाग पूणे पृष्ठ क्र. 38.

4. पाटील बी.बी.: महाराष्ट्र शासन आणि राजकारण पृष्ठ क्र. 1 ते 32.

5. मोरे संग्राम : महाराष्ट्राच्या राजकारणातील आघाड्या व भवितव्य पृष्ठ क्र. 1 ते 40

6. एरंडे व्हि.एल : भारतीय लोकशाही अपेक्षा आणि वास्तव पृष्ठ क्र. 149, 161, 177, 136.

7. एरंडे व्ही.एल. : भारतीय राजकारणातीलबदलते प्रवाह, पृष्ठ क्र.43 ते 56, पृष्ठ क्र. 125, 257 199.

8. घोटाळे विवेक : भारतीय राजकारणातील बदलते प्रभाव आघाड्याचे राजकारण.

9. चौसाळकर अशोक : भरताचे बदलते राजकारण आणि नव भरताची नर्मिती प्रबोधन प्रकाशन, इचलकरंजी 22 मे 1997.

10. देवरे पी.डी. : विचार मंथन

11. कुरुंदकर नरहर : लोकशाही स्वरूप व समस्या प्रबोधन प्रकाशन लातूर, जूलै 1988.

12. पळशीकर सुहास 15 एप्रिल 2010 : महाराष्ट्रातील सत्ता संघर्ष. राजकीय पक्षांची वाटचाल समकालीन प्रकाशन पूणे.

13. कांबळे बाळ : भारतीय लोकशाही समोरील आव्हाने डायमंड पब्लीकेशन पूणे 2012.

14. साठे सत्यरंजन : भारताच्या राज्यघटनेची 50 वर्षे कॉरिनेन्टल प्रकाशन पूणे 2012

15. भांडारी माधव : प्रतिमा आणि वास्तव

16. पळशीकर सुहास : समकालीन भारतीय राजकारण प्रतिमा प्रकाशन पूणे 2004.

मार्गदर्शक

प्रा.डॉ.माधव माणिकराव चोले

राज्यशास्त्र विभाग

देगलूर महाविद्यालय, देगलूर

संशोधक

शंकर हणमंतराव पाटील